शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न अशासकीय, अनुदानित/विनाअनुदानित, कला, वाणिज्य, विज्ञान,
शिक्षणशास्त्र, विधी व शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
कोल्हापूर/सांगली/सातारा.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेबाबत विभागीय सहसंचालक, उ.शि. कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे जा. क्र. विससं/उशि/कोवि/डीबीटी/२०१९ चे या कार्यालयास प्राप्त दि. ०७/१०/२०१९ रोजीचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ परीपत्रक नं. 433
दि. 11 OCT 2019

d:\2019\mangutkar\circular.docx

**महाराष्ट्र शासन**

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४

E-mail: jdhekop@gmail.com Website:w.w.w.jdhekop.org,

फोन क्र. : (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००

जा.क्र. : विसस/उशि/कोवि/डीबीटी/२०१९ दिनांक : -

प्रति,

१. कुलसचिव,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

२. प्राचार्य,

सर्व अशासकीय,अनुदानित/विनाअनुदानित कला,वाणिज्य,
विज्ञान,शिक्षणशास्त्र,विधी व शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
कोल्हापूर/सांगली/सातारा

विषय - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पद्धतीने प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत.

संदर्भ - १. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य- २०१९/डीबीटी/१०११४,दि.३०.७.२०१९
२. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य/२०१९/डीबीटी/१०२०७,दि.३१.७.२०१९
३. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/शिष्य/२०१९/डीबीटी/१०६९५,दि.९.८.२०१९
४. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०८०२,दि.२०.८.२०१९
५. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१३५६९,दि.७.१०.२०१९

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्जांची संख्या ही पात्र विद्यार्थी संख्येच्या प्रमाणपात ,खूप कमी असल्याचे निदर्शनास आल्याचे सूचित केले आहे.

तरी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पद्धतीने भरण्याची अंतिम मुदत **दि. १०.१०.२०११९** असून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शक्य तितक्या लवकर अर्ज भरणेसाठी कळविण्यात यावे.

विद्यार्थ्यांना डीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची आपले स्तरावरावरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पूर्ण करणेबाबत वारंवार लेखी सूचना देऊनही सद्यस्थितीत अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज आपले स्तरावर प्रलंबित असल्याचे दिसून येते.

सदर अर्जांची महाविद्यालाच्या लिपीक व प्राचार्य यांच्या लॉगीनवरुन पडताळणी करण्याची अंतिम मुदत दि. २३.१०.२०१९ अशी आहे. **तरी कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय स्तरावरील लॉगीनवर शिष्यवृत्ती अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.**

आपल्या महाविद्यालयातील शिष्यवृत्तीबाबतची माहिती ना मिळाल्यामुळे/प्रलंबित राहिल्यामुळे एकही शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी वंचित राहील्यास याची सर्वसवी जबाबदारी महाविद्यालयांचे प्राचार्य/विद्यापीठाचे कुलसचिव यांची राहील याची नोंद घ्यावी.

विभागीय सहसंचालक उ.शि.
कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

Scanned with CamScanner